भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/८६**

आरपीसीडी.जीएसएस डीआयव्ही.बीसी.क्र.३/०९.०९.०१/२०११-१२ जुलै १, २०११

अध्यक्ष / संचालक
सर्व भारतात शेड्युल कमर्शियक बँक

महोदय,

**महापरिपत्रक**

**महापरिपत्रक - प्राधान्य क्षेत्रातील कर्जे - अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमातीसाठी (एसटी) कर्जसुविधा**

भारतीय रिझर्व बँकेने, अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमातींना (एसटी) कर्ज सुविधा उपलब्ध करण्या संबंधाने, बँकांना नियतकालिकतेने सूचना/निर्देश दिले आहेत ह्याबाबतच्या सर्व सूचना बँकांना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, विद्यमान असलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश समाविष्ट करून एक महापरिपत्रक तयार करण्यात आले असून त्याला पुरवणी जोडण्यात आली आहे. हे महापरिपत्रक अद्यावत करण्यात आले असून, रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या मागील सूचनाही त्यात समाविष्ट करण्यात आल्या असून त्या जोडपत्र ३ मध्ये दिलेल्या आहेत.

कृपया याची पोच द्यावी.

आपला,

सही/-

(डॉ. दिपाली पंत जोशी)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

ग्रामीण योजना व कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, १०वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, शहीद भागतसिंह मार्ग, पो.बॉ १००१४. मुंबई ४००००१. टेलिफोनः २२६० १००० फेक्स : २२६१ ०९४३/२२६१ ०९४८ ई-मेलः cgmincrpcd@rbi.org.in

**अनुक्रमणिका**


१. एससी/एसटींना कर्ज दिले जाणे

२. जोडपत्र १ - मार्च/सप्टेंबरच्या शेवटच्या अहवालाच्या शुक्रवारी असलेले, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींना दिलेल्या अग्रिम राशी दर्शविणारे विवरणपत्र

३. जोडपत्र २ - मार्च महिन्याच्या अहवालाच्या शुक्रवारी असलेले, विभेदक व्याजदर योजनेखाली, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींना दिलेल्या अग्रिम राशी दर्शविणारे विवरणपत्र

४. जोडपत्र ३ - ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

**महापरिपत्रक - प्राधान्य क्षेत्रातील कर्जे - अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमातीसाठी (एसटी) कर्जसुविधा**

## १. एससी/एसटींना कर्ज दिले जाणे

१.१ अनुसूचित जाती व जमातींच्या कल्याणावर खास जोर देण्यात आला आहे. एससी/एसटींना दिल्या जाणाऱ्या अग्रिम राशी वाढविण्यासाठी, बँकांनी पुढील उपाय योजावेत :

**योजनेची प्रक्रिया**

अ) ब्लॉकच्या स्तरावर, योजनेच्या प्रक्रियेमध्ये अनुसूचित जाती व जमातींना विशिष्ट भार दिला पाहिजे, त्यानुसार, कर्जाच्या योजना, अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थ होण्यावर भर दिला जावा आणि अशा योजनांमध्ये ते भाग घेतील आणि स्वयंरोजगारांसाठी त्यांना अधिकतर कर्ज दिले जाईल ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, विशेष अशा त्यांना बँकिंग करता येण्यासारख्या योजना तयार केल्या जाव्यात. ह्या जाती-जमातींचे कर्ज प्रस्ताव, अत्यंत सहानुभूतीने व समजुतदारपणे विचारात घेणे बँकांसाठी आवश्यक आहे.

ब) लीड बँक योजनेखाली स्थापन झालेल्या जिल्हास्तरीय सल्लागार समित्यांनी, बँका व विकास एजन्सींच्या दरम्यान समन्वय साधणाऱ्या मुख्य यंत्रणा म्हणून त्यांचे कार्य सुरु ठेवावे.

क) लीड बँकांद्वारे तयार केलेल्या जिल्हा कर्ज योजनांमध्ये, रोजगार व विकासयोजना ह्यांच्याशी असलेली कर्जांची जोडणी अधिक विस्ताराने दिली जावी.

ड) स्वयंरोजगार प्रयोजित करण्यासाठी निरनिराळ्या जिल्ह्यात स्थापन केल्या गेलेल्या जिल्हा उद्योग केंद्रांबरोबर बँकांनी निकटचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

ई) कर्जे ठरलेल्या कालावधीतच दिली जात आहेत, ती पुरेशी, व उत्पादनाधिमुख असून ती आपोआप वसुल होण्यासाठी त्यामुळे वाढते उत्पन्न मिळेल हे पाहण्यासाठी, बँकांनी त्यांच्या कर्ज देण्याच्या कार्यरीती व धोरणे ह्यांचा नियतकालिक आढावा घ्यावा.

फ) कर्ज योजना, अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थ करण्यावर जोर दिला जावा. ह्या जाती-जमातींच्या कर्ज प्रस्तावांवर त्वरित व सहानुभूतीने विचार केला जावा.

ग) मोठ्या प्रमाणावर कर्ज देण्यासाठी 'खेडे' 'दत्तक' घेतेवेळी ह्या जाती जमातींची लक्षणीय लोकसंख्या असलेली खेडी निवडावीत किंवा त्याच प्रमाणे अशा जातीजमातींची लक्षणीय लोकसंख्या असलेली त्या खेड्यातील वस्त्याही दत्तक घेण्याचा विचार केला जावा.

ह) ह्या जातीजमातींसह दुर्बल घटकांसाठीही बँकिंग करता येण्याजोग्या, योग्य अशा योजना तयार करण्यास खास प्रयत्न केले जावेत.

## बॅंकांची भूमिका

आय) गरीब कर्जदारांचे अर्ज मिळाल्याच्या तारखेनंतर ठरविलेल्या कालावधीत त्यांना कर्ज सुविधा मिळावी ह्यासाठी, बॅंकेच्या कर्मचाऱ्यांना अशा गरीब कर्जदारांना, त्यांचे अर्ज भरण्यास व इतर कारवाई पूर्ण करण्यास मदत करावी.

जे) ह्या कर्ज सुविधेचा लाभ घेण्यास एससी/एसटींना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांच्यामध्ये, बॅंकांनी तयार केलेल्या निरनिराळ्या योजनांबाबतची जाणीव निर्माण केली गेली पाहिजे. पात्र असलेले बहुतेक कर्जदार अशिक्षित असल्या कारणाने, पुस्तिका, हस्तपत्रिका इत्यादिंमधून दिलेली प्रसिध्दी विशेष उपयोगाची नाही. ह्यापेक्षा चांगली रीत म्हणजे, बॅंकांच्या फील्डस्टाफने अशा कर्जदारांशी संपर्क साधावा आणि त्यांना त्या योजनांची मुख्य लक्षणे व मिळणारे लाभ सांगावेत. बॅंकांनी, त्यांच्या शाखांना विशेषकरुन एससी/एसटींच्या कर्जगरजा समजावून घेण्यास अशा सभाबैठकी वारंवार घेण्यास सांगून, त्यांचा समावेश कर्ज योजनेत करावा.

के) बॅंकांनी, अर्जांचे/ठेवींचे रजिस्टर, तक्रारींचे रजिस्टर योग्य रितीने ठेवावे आणि हिंदी व इंग्लिशबरोबर स्थानिक भाषेतही संबंधित कागदपत्रे व पासबुक ठेवावे.

ल) आरबीआय/नाबार्ड ह्यांनी प्रसुत केलेली परिपत्रके अनुपालन करन्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये प्रसुत करावीत.

म) एससी/एसटीच्या कर्जदारांकडून सरकारी दारिद्र्य निर्मूलन योजना/ स्वयंरोजआर योजनेखाली आलेल्या अर्जावर विचार करताना, बॅंकांनी, कर्जदारांकडून ठेवी/जमा बाबत आग्रह धरु नये. कर्ज घटकाचे वाटप करतेवेळी, बॅंकेचे पूर्ण येणे वसूल होईपर्यंत लागु असलेली सबसीडी थांबवून धरण्यात येणार नाही ह्याचीही खात्री केली जावी. सुरुवातीलाच सबसिडी न देणे हे अपुरे वित्तसहाय्य ठरते त्यामुळे मालमत्ता निर्माण/उत्पन्न निर्माणात बाधा निर्माण होते.

न) कल्याण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली, राष्ट्रीय एससी/एसटी वित्त व विकास निगम स्थापन करण्यात आला आहे. ह्या संस्थेला पाहिजे असलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी, बॅंकांनी, त्यांच्या शाखा/नियंत्रक कार्यालयांना सर्व प्रकारचे संस्थात्मक देण्यास सांगावे.

ओ) ह्या लाभार्थींनी, (म्हणजे, कारागिर, संस्थाचे ग्राम व कुटिरोद्योग) निर्माण केलेल्या मालाचे विपणन करण्यास आणि/किंवा त्यासाठी कच्चा माल खरेदी करण्यासाठी राज्यसरकार प्रायोजित, एससी/एसटीच्या संस्थांना मंजूर केलेल्या अग्रिमराशींना प्राधान्य क्षेत्रातील अग्रिम राशी समजले जावे. मात्र, अशा अग्रिमराशी, ह्या संस्थांच्या लाभार्थींना, केवळ कच्च्या मालाची खरेदी आणि/किंवा तयार मालाचे वितरण ह्यासाठीच दिल्या जात असाव्यात.

**<u>एससी/एसटी विकास निगमाची भूमिका</u>**

प) भारत सरकारच्या कल्याण मंत्रालयाने, सर्व राज्य सरकारांना सांगितले आहे की, अनुसूचित जाती विकास निगम, बँकेद्वारा वित्तसहाय्याचा बँकेच्या योजना/प्रस्तावांवर विचार करु शकते. कर्जासाठी तारणात्मक प्रतिभूती आणि /किंवा तृतीय पक्षाच्या हमीसंबंधीने, प्राधन्य क्षेत्रातील कर्जावरील बँकांना दिलेली मार्गदर्शक तत्वे लागु होतील.

**<u>अर्ज फेटाळले जाणे.</u>**

क्यू) एससी/एसटींच्या बाबतीत अर्ज फेटाळले गेल्यास, ते शाखा स्तरावर करण्याऐवजी, त्यावरील उच्च स्तरावर केले जावे, ह्याशिवाय ते फेटाळले जाण्याची कारणे स्पष्टपणे देण्यात यावीत.

**<u>केंद्र प्रायोजित योजना</u>**

बँकांद्वारे कर्ज दिले जाऊन सरकारी एजन्सीज्मार्फत सबसिडी दिली जाणाऱ्या अशा अनेक केंद्र प्रायोजित मुख्य योजना आहेत. ह्या योजनांखाली देण्यात आलेल्या कर्ज प्रवाहावर आरबीआयची देखरेख असते. ह्यापैकी प्रत्येक योजनेखाली, एससी/एसटी जमातींसाठी लक्षणीय आरक्षण/शिथिलता ठेवण्यात आली आहे.

**<u>केंद्र प्रायोजित मुख्य योजनांखाली एससी/एसटीच्या लाभार्थींसाठी आरक्षण</u>**
**<u>स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एसजीएसवाय)</u>**

र) ग्रामिण अर्धनागरी क्षेत्रातील एक दारिद्र्य निर्मूलन योजना असलेल्या, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेखाली (एसजीएसवाय), सहाय्य करण्यात आलेल्या कुटुंबांपैकी ५०% कुटुंबे एससी/एसटी असावीत.

***स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना***

एस) नागरी क्षेत्रातील दारिद्र्य निर्मूलन योजना असलेल्या, स्वर्णजयंती शहरी रोजगार योजनेखाली (एसजेएसआरवाय) एससी/एसटींना, त्यांच्या स्थानिक लोकसंख्येतील बळावर/प्रमाणावर अग्रिम राशी दिल्या जाव्यात.

***विभेदक (डिफरेंशियल) व्याजदर योजना***

टी) ह्या डीआरआय योजनेखाली, निर्माणात्मक व लाभदायक कार्यकृतीं करण्यासाठी, समाजातील दुर्बल घटकांना, बँका, रु १५०००/- पर्यंतचे अर्थसहाय्य दरसाल दरशेकडा ४ टक्के ह्या स्वलतीच्या व्याजदराने देतात. ह्या विभेदक व्याजदर योजनेखाली (डीआरआय) एससी/एसटी असलेल्या व्यक्तींनाही योग्य तो लाभ मिळण्यासाठी, बँकांना सागण्यात आले आहे की, त्यांनी एकूण डीआरआय अग्रिम राशींच्या २/५ (४० टक्के) एवढी अग्रिम राशी, एससी/एसटीमधील मात्र असलेल्या कर्जदारांना घ्यावी.

*कचरा गोळा करणारांची (स्कॅव्हेंजर्स) मुक्तता व पुनर्वसन करण्यासाठी योजना*

यु) कचरा गोळा करणारांची (स्कॅव्हेंजर्स) मुक्तता व पुनर्वसन करण्यासाठी योजना ही, कचरा गोळा करणारे व त्यांच्यावर अवलंबून असलेले कुटुंब ह्यांच्यासाठी, दिवसभराचा कचरा व घाण गोळा करण्याच्या त्यांच्या सध्याच्या आनुवांशिक व घाणेरड्या व्यवसायापासून मुक्त करण्यासाठी व त्यांना दुसरा मानाचा व्यवसाय देण्यासाठी आहे. ह्या योजनेमध्ये मूलतः अनुसूचित जातीमधील कचरा गोळा करणारांचा समावेश आहे. इतर जमातीमधील कचरा गोळा करणारेही अर्थसहाय्य मिळविण्यास पात्र आहेत. ह्या योजनेला आता स्कीम फॉर रिव्हॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स (एसआरएमएस) असे नवे नाव देण्यात आले आहे.

*केंद्र प्रायोजित मुख्य योजनांमध्ये एससी/एसटी लाभार्थींसाठी आरक्षण*

व्ही) एसजीएसवाय योजनेखाली, एससीएसटींना, सर्वसाधारण वर्गातील लाभार्थींसाठी असलेल्या, प्रकल्प ख्र्चाच्या ३०% सबसिडी व कमाल रु ७,५००/- च्या मर्यादेविरुध्द, प्रकल्प खर्चाच्या ५०% सबसिडी व रु १०,०००/- एवढी कमाल मर्यादा मिळू शकतात.

डबल्यु) डीआरआय योजनेखाली, धारण केलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ १ एकरापेक्षा अधिक नसावे व सिंचन नसलेली जमीन २.५ एकरापेक्षा अधिक नसावी हा पात्रतेचा निकष, एससी/एसटींना लागु नाही. ह्या योजनेखाली उपलब्ध असलेल्या (२००७-०८ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात घोषित केल्यानुसार) रु १५,०००/-च्या वैय्यक्तिक कर्जा व्यतिरिक्त, ह्या योजनेच्या उत्पन्नबाबतच्या अटी पूर्ण करणाऱ्या एससी/एसटीना, प्रति लाभार्थी, रु २०,०००/- चे गृहकर्जही मिळू शकते.

## २. देखरेख व पुनरावलोकन

२.१) एससी/एसटीच्या लाभार्थींना दिलेल्या कर्जप्रवाहावर देखरेख ठेवण्यासाठी, मुख्य कार्यालयात एक कक्ष स्थापन करण्या यावा. आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्याव्यतिरिक्त, शाख़ांकडून संबंधित माहिती/डेटा गोळा करणे, ती एकत्र करणे आणि आवश्यक ते अहवाल आरबीआयकडे व सरकारकडे पाठविणे ह्यासाठीही तो कक्ष जबाबदार असेल.

२.२) आमंत्रक बँकेने (एसएलबीसी)ची, एससी/एसटींसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या प्रतिनिधीला एसएलबीसीच्या सभेस उपस्थित राहण्याचे आमंत्रण घ्यावे. ह्याशिवाय, ह्या सभांना हजर राहण्यासाठी, आमंत्रक बँकेने, राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्तीय व विकास निगम (एनएसएफडीसी) आणि राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वित्तीय व विकास निगम (एससीडीसी) ह्यांच्या प्रतिनिधींनाही आमंत्रण आहे.

२.३) शाखाकडून मिळालेले अहवाल व इतर माहिती ह्यांच्या आधारावर, एससी/एसटींना दिलेल्य कर्जाबाबत, बँकांच्या मुख्य कार्यालयांनी नियतकालिक आढावा.

२.४) संचालक मंडळानेही, तिमाही धर्तीवर, एससी/एसटी कर्जदारांना दिलेला कर्जप्रवाह वाढविण्यासाठी केलेल्या उपायांचे पुनरावलोकन करावे. ह्या पुनरावलोकन टाचणात, संबंधित तिमाहीमध्ये बँकेने केलेल्या कामगिरीव्यतिरिक्त, डीआरआय, एसजीएसवाय इत्यादी योजनांच्या संदर्भात, भावी व्यवसायधंदा आणि शाखांचे नेटवर्क संबंधाने, त्या विभागाने केलेली प्रत्यक्ष कामगिरी वाढविण्यास बँक काय करु शकते हे देखील नोंद करण्यात यावे मुख्य कार्यालय, नियंत्रक कार्यालय ह्यामधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्या विभागातील भेटी ह्यावर आधारित, निरनिराळ्या उद्देशांसाठी, ह्या जमातींना, राज्यस्तरीय अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती निगमांच्या मार्फत कर्ज देण्यामधील प्रगतीबाबतचा विचारही अशा अहवालात समाविष्ट केला जावा. अशा पुनरावलोकन टाचणाची एक प्रत रिझर्व बँकेकडे पाठविली जावी.

## ३. अहवाल देण्याच्या आवश्यकता

प्राधान्य क्षेत्रे आणि विभेदक (डिफरांशियल) व्याजदर (डीआरआय) योजना ह्या दोन्हीही खाली, एससी/एसटींना बँकेने दिलेल्या अग्रिम राशींची माहिती वेगवेगळी मिळणे आवश्यक समजले जाते. त्यानुसार, मार्च व सप्टेंबरच्या अखेरच्या अहवाल पाठविण्याच्या शुक्रवारी असल्यानुसार आधारित, सहामाही धर्तीवर बँकांनी, प्राधान्य क्षेत्राखाली एससी/एसटींना दिलेल्या कर्जाचा निर्देश करणारे विवरणपत्र रिझर्व बँकेकडे पाठवावे (जोडपत्र १), ह्याशिवाय, मार्च महिन्याच्या शेवटच्या अहवाल शुक्रवारी असल्यानुसारच्या आधारावर, एससी/एसटींना, डीआरआय योजनेखाली दिलेल्या कर्जांचे विवरणपत्र दरसाल सादर करावे (जोडपत्र २) ही विवरणपत्रे, संबंधित सहामाही/वर्ष संपल्याच्या दोन महिन्यांच्या आत आरबीआयकडे पोहोचली पाहिजेत

**जोडपत्र - १**
**(परिच्छेद ३)**

**मार्च/सप्टेंबरच्या शेवटच्या अहवाल शुक्रवारी असल्यानुसार अनुसूचित जाती/अनुसूचित कमातींना दिलेल्या अग्रिम राशी दर्शविणारे विवरणपत्र**

| | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नंबर ऑफ अकाउंट | बॅलेन्स आउटस्टेंडिंग | नंबर ऑफ अकाउंट | बॅलेन्स आउटस्टेंडिंग | नंबर ऑफ अकाउंट | बॅलेन्स आउटस्टेंडिंग |
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **प्राधन्य क्षेत्रातील अग्रिम राशी** | | | | | | |
| १ | १. शेतकी<br>अ)थेट/प्रत्यक्ष<br>ब) अप्रत्यक्ष | | | | | | |
| | ह्यापैकी ५ एकर किंवा कमी जमीन असलेल्या छोट्या/सीमांत शेतकऱ्यांना व जमीन<br>नसलेल्या मजुरांना<br>दिलेल्या अग्रिम राशी | | | | | | |
| २ | छोटे उपक्रम (निर्माण व सेवा उपक्रम ह्यासह)<br>अ) थेट/प्रत्यक्ष<br>ब) अप्रत्यक्ष | | | | | | |
| | ह्यापैकी १) निर्माण २) सेवा उपक्रम ह्यांना दिलेल्या अग्रिम राशी ३) खादी व ग्रामोद्योग क्षेत्रातील एककांना दिलेल्या अग्रिम राशी | | | | | | |
| ३ | किरकोळ व्यापार | | | | | | |
| ४ | शिक्षण | | | | | | |
| ५ | हाउझिंग लोन | | | | | | |
| ६ | मायक्रो कर्ज (शेती व संबंधित कार्यकृती ह्यासाठी एसएचजी/जेएलजी ह्यांना दिलेली कर्जे सोडून अन्य कर्जे | | | | | | |
| ७ | लाभार्थींना कच्चा माल विकत घेण्यासाठी आणि/किंवा पक्क्या मालाचे वितरण करण्यासाठी एससी/एसटीसाठी असलेली राज्य प्रणीत संस्था (स्तंभ ५ व ६ मध्ये दाखविता येईल. | | | | | | |
| ८ | एससी/एसटी व्यक्तींना, (वरील प्रमाने भागीदार संस्थांसोडून) दिलेली, फक्त एससी/एसटी व्यक्ती असलेल्या एसएचजी/जेएलजींना दिलेली कर्जे | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | |

जोडपत्र १ (अ)

**मार्च/सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या अहवाल शुक्रवारी असल्यानुसार, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी द्यावयाचे विवरणपत्र**

| | | |
|---|---|---|
| | (रक्कम हजार रुपयांत) | |
| | अनुसूचित जमाती | |
| केवळ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी पब्लिक सेक्टर बँक | नंबर ऑफ अकाउंट | बॅलेन्स आउटस्टेंडिंग |
| एनएसटीएफडीसी* मायक्रो-कर्ज योजनेखाली, एसटींचा मालकीच्या एसएचजींना दिलेली कर्जे | | |
| | | |

*एनएसटीएफडीसी - नॅशनल शॅड्युल्ड ट्राईब्ज फायनान्स डेव्हलपमेंट कॉरपोरेशन

जोडपत्र २

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मार्च महिन्याच्या शेवटच्या अहवाल शुक्रवारी असलेल्या, विभेदक व्याजदर योजनेखालील अग्रिम राशी** | | | | | | |
| | | **अनुसूचित जाती** | | **अनुसूचित जमाती** | | **एकूण** | |
| | | **नंबर ऑफ अकाउंट** | **बॅलेन्स आउटस्टेंडिंग** | **नंबर ऑफ अकाउंट** | **बॅलेन्स आउटस्टेंडिंग** | **नंबर ऑफ अकाउंट** | **बॅलेन्स आउटस्टेंडिंग** |
| | | **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १. | थेट दिलेल्या अग्रिम राशी | | | | | | |
| २. | पुढील मार्फत दिलेल्या | | | | | | |
| | अ) प्रादेशिक ग्रामिण बँका | | | | | | |
| | ब) अनुसूचित जाती/जमातींचे राज्य प्रायोजित निगम | | | | | | |
| | क) सहकारी संस्था/ सरकारने विशिष्ट क्षेत्रात नेमलेल्या एलएमपीएस | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | |

**अनुसूचित जातीं /अनुसूचित जमातीं ना कर्ज सुविधा**
**महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी**

| क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१७२/सी.४६४(आर)-७८ | १२.१२.७८ | रोजगार वाढविण्यातील बँकांची भूमिका |
| २. | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.८/सी.४५३(के)-जीईएन | ०९.०१.७९ | लहान व सीमांत शेतकऱ्यांना शेतीविषयक कर्ज |
| ३. | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४५/सी.४६९(८६)-८१ | १४.०४.८१ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| ४. | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३२/सी.५९४-८१ | २२.१०.८१ | अनुसूचित जातींच्या विकासावरील कार्यकारी गटाच्या शिफारसी |
| ५ | आरपीसीडी.क्र.पीएस.बीसी.२/सी.५९४-८२ | १०.०९.८२ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| ६. | आरपीसीडी.क्र.पीएस.बीसी.९/सी.५९४-८२ | ०५.११.८२ | एससी/एसटी विकास निगमांना सवलतयुक्त बँक वित्तसहाय्य |
| ७. | आरपीसीडी.क्र.पीएस.बीसी.४/सी. ५९४-८३ | २२.०८.८३ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| ८. | आरपीसीडी.क्र.पीएस.१७७७/सी. ५९४-८३ | २१.११.८३ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| ९. | आरपीसीडी.क्र.पीएस.१८१४/सी.५९४-८३ | २३.११.८३ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| १०. | आरपीसीडी.क्र.पीएस.बीसी.२०/सी.५६८(बी)-८४ | २४.०१.८४ | एससी/एसटींना कर्ज सुविधा - कर्जाचे अर्ज फेटाळले जाते. |
| ११. | आरपीसीडी.क्र.सीओएनएफएस/२७४/पीबी-१-८४/८५ | १५.०४.८५ | एससी/एसटींना कर्ज देण्यामधील खाजगी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | क्षेत्रातील बँकांची भूमिका |
| १२. | आरपीसीडी.क्र.सीओएनबीफएस.६२/पीबी-१-८५/८६ | २४.०७.८५ | एससी/एसटींना कर्ज देण्यामधील खाजगी क्षेत्रातील बँकांची भूमिका |
| १३. | आरपीसीडी.क्र. एसपी.बीसी.२२/सी.४५३(यु)-८५ | ०९.१०.८५ | डीआरआय योजनेखाली अनुसूचित जमातींना कर्ज सुविधा |
| १४. | आरपीसीडी.क्र.एसपी.३७६/सी-५९४-८७/८८ | ३१.०७.८७ | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| १५. | आरपीसीडी.क्र.एसपी.बीसी.१२९/सी.५९४(एसपीआय)/ ८८-८९ | २८.०६.८९ | राष्ट्रीय एससी/एसटी वित्तसहाय्य व विकास निगम |
| १६. | आरपीसीडी.क्र.एपी.बीसी.५०/सी.५९४-८९/९० | २५.१०.८९ | अनुसूचित जाती विकास निगम - एकक किंमतीवरील सूचना |
| १७. | आरपीसीडी.क्र.एसपी.बीसी.१०७/सी.५९४-८९/९० | १६-०५-९० | एससी/एसटींना कर्ज सुविधा |
| १८. | आरपीसीडी.क्र.एसपी.१००५/सी.५९४/९०-९१ | ०४-१२-९० | अनुसूचित जाती/जमातींना कर्जसुविधा - मूल्यमापन अभ्यास |
| १९. | आरपीसीडी.क्र. एसपी.बीसी.९३/सी.५९४. एमएमएस-९०/९१ | १३.०३.९१ | अनुसूचित जाती विकास निगम (एससीडीसी)- एकक किंमतीवरील सूचना |
| २०. | आरपीसीडी.क्र. एसपी.बीसी.१२२/सी.४५३(यु)-९०-९१ | १४.०५.९१ | एससी/एसटींना गृहवित्त सुविधा - डीआरआय योजनेत समावेश |
| २१. | आरपीसीडी.क्र. एसपी.बीसी.११८/सी.४५३(यु)-९२/९३ | २७-०५-९३ | प्राधान्य क्षेत्रातील अग्रिम राशी - गृहवित्त |
| २२. | आरपीसीडी.क्र. एलबीएस.बीसी.८६/०२.०१.०१/९६-९७ | १६.१२.९६ | एससींसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगाचा समावेश |